दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB · Racold · legrand · HAVELLS · Finolex · KOLORS · USHA · PHILIPS · SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक ५५ वा रविवार दि.२८ जूलै २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# ओबीसींचे १०० आमदार निवडून आले पाहिजेत

सांगली : प्रतिनिधी–'ओबीसींच्या डोक्यात खूळ बसले आहे की, हिंदू खतरे में हैं. पण हे खूळ बाजूला करावे लागेल. हे खूळ भाजपने उभे केले आहे. भाजप ओबीसींच्या बाजूने का नाही? त्यामुळे हे धर्माचे भूत उभे केले आहे. या निवडणुकीत आरक्षण वाचायचे की जाऊ द्यायचे, तर स्वत:ला मतदान करायचे आहे. एक छगन भुजबळ निर्माण करून चालणार नाही, अनेक भुजबळ उभे करावे लागणार आहेत. ओबीसींचे १०० आमदार निवडून आले पाहिजेत', असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची आरक्षण बचाव यात्रा आज सांगलीत पोहोचली. यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी आरक्षणाच्या बचावासाठी महत्त्वाचे आवाहन केले.

ओबीसीच्या ५७ जागा राखीव आहेत. तर याच्यावर नजर असणार आहे. या निवडणुकीत आरक्षण बचाव हा मुद्दा असणार आहे. पण कुठलीही पार्टी आरक्षण वाचवण्याच्या बाजूने आहे की नाही हे पाहणार आहे. ओबीसींचे किमान १०० उमेदवार निवडून आणणार का? हे पाहावे लागेल. सगेसोयरे कायदा आणायचा यांनी ठरवले तर छगन भुजबळ थांबवू शकत नाहीत. कारण आपले संख्याबळ नाही. त्यामुळे हे सर्व पक्ष ओबीसींच्या विरोधात आहेत. आणि येणा-या निवडणुकीत पक्ष बघू नका, स्वत:कडे बघा, आरक्षण वाचवणा-याकडे बघा', असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी केले.

आरक्षण भिजत ठेवण्याचे काम

आरक्षण भिजत ठेवण्याचे काम हे करत आहेत. आता जी विधानं होत आहेत ते चिंताजनक आहे. एक तर आम्हाला द्या,



नाहीतर सगळ्यांचे काढून घ्या. तर शरद पवार यांची मुलाखत होती की, येणा-या निवडणुकीमध्ये समाजाचे २२५ आमदार असतील. जरांगे पाटील खरा आहे, खोटा आहे? हे कुणीच सांगायला तयार नाही. आणि सगळ्यांनीच ठरवले आहे की, आपण मराठा समाजाची बाजू घ्यायची, असा मोठा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला.

# श्री क्षेत्र निळकंठेश्वर देवस्थान विकासासाठी पाच कोटी रुपयाचा निधी मिळवून देणार

## भाजपाचे नेते आ.रमेशआप्पा कराड यांची ग्वाही; मंदिरास 'ब' दर्जा मिळून दिल्याबद्दल आभार व्यक्त

लातूर :- असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर या देवस्थानास राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत 'ब' दर्जा प्राप्त झाला असून या मंदिराच्या सर्वांगीण विकासाचा आणि भाविक भक्तांच्या सोयी सुविधेचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करा निश्चितपणे पाच कोटी रुपयांचा निधी राज्यातील महायुती शासनाकडून मिळवून देऊ अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर देवस्थानास राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत 'ब' दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा श्री निळकंठेश्वर देवस्थान आणि निळकंठ, पिंपळगाव, आंबा, मसला, भोसा, तांदूळजा यासह विविध गावातील भाविक भक्त आणि नागरिकांच्या वतीने लातूर येथे भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर हे जागृत देवस्थान असून या मंदिर परिसरात येणाऱ्या भाविक भक्तासह प्रत्येकास प्रसन्नता मिळते. भाविकांची वाढती संख्या पाहता या मंदिर परिसराचा विकास व्हावा येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी अधिकचा निधी आवश्यक असल्याने या मंदिराचा राज्य शासन ग्रामविकास विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ, तीर्थक्षेत्र विकास योजनेचा 'ब' दर्जा मिळवून दिला आहे. यामुळे मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही. तेव्हा मंदिर ट्रस्ट आणि त्या परिसरातील



नागरिकांनी सर्वांगीण विकासाचा आणि भाविक भक्तांना सोईसुविधा मिळाव्यात असा परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ शासनाकडे सादर करावा या प्रस्तावास मान्यता मिळवून देण्याचे काम करू अशी ग्वाही दिली.

निळकंठ आणि परिसरातील नागरिकांनी मंदिराच्या विकासाचा एकीने निर्णय घेतला. ही आनंदाची बाब असून आपण सर्वजण मिळून चांगला विकास घडून आणू. श्रद्धेचे स्थान, मंदिराचे वैभव आणि उंची टिकविण्याचे काम करू या. राज्य शासनाकडून या मंदिर परिसराच्या विकासासाठी निश्चितपणे किमान पाच कोटी रुपयांचा निधी मिळून देऊ असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मंदिर परिसरात होणारी विकास कामे दर्जेदार व्हावीत, पिढ्यान पिढ्या टिकणारी कामे झाली पाहिजे अशी सूचना केली.

लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर देवस्थान येथे स्वयंभू शिव व शक्ती अशा दोन पिंड विराजमान आहेत. हे खूप दुर्मिळ आहे. या देवस्थानास सातत्याने असंख्य भाविकभक्त श्रद्धेने येत असतात. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेवून येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात मंदिर परिसराचा विकास व्हावा यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत श्रीक्षेत्र निळकंठेश्वर देवस्थानाला 'ब' दर्जा मिळवून दिला. सदरील ब दर्जा प्राप्त झाल्याने मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद होऊन भाविकांसाठी विविध सोयी सुविधा बरोबरच या मंदिर परिसरचा सर्वांगीण विकास होणार आहे. देवस्थानास 'ब' दर्जा मिळून दिल्याबद्दल आ रमेशआप्पा कराड साहेब यांचे श्री निळकंठेश्वर देवस्थानचे पदाधिकारी आणि त्या परिसरातील विविध गावातील भाविक भक्त आणि नागरिकांच्या वतीने यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, श्रीनिळकंठेश्वर देवस्थानचे अध्यक्ष शिवदत्त औताडे, भुजंग औताडे, गणेश पुरी, किरण शिंदे, शालीक औताडे, शिवाजी आंबेकर, चेअरमन चंद्रकांत वागस्कर, प्रभू औताडे, श्यामसुंदर वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, बापूराव बिडवे, अशोक सावंत, कमलाकर भुसारे, महेश आताडे, अच्युत पिसाळ, हनुमंत औताडे, मधुकर बिडवे, रामभाऊ पिसाळ, सुभाष पिसाळ, तानाजी ढोबळे, महादेव बिडवे, बापुराव बिडवे, मेघराज पिसाळ, विजय पिसाळ, युवराज औताडे, अच्युत पिसाळ, सुखदेव कुकर, रामेश्वर पाटील, वामन बिडवे, मधुकर बिडवे, मुन्ना पिसाळ, अभिषेक बिडवे, अर्जुन वाघमारे, रामभाऊ पिसाळ, औदुंबर पवार, यांच्यासह पिंपळगाव आंबा, निळकंठ, भोसा, मसला, तांदूळजा या विविध गावातील नागरिक, भाविक भक्त आणि भाजपाचे लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर शिष्टमंडळाने माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची घेतली भेट, ध्वजारोहण सोहळ्याचे दिले निमंत्रण



लातुर / प्रतिनिधी : – साहीत्यसम्राट अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर – २०२४ शिष्टमंडळाने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची ।शनिवार दि. २७ जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहण सोहळ्याचे त्यांना निमंत्रण देऊन विविध विषयावर चर्चा केली. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष राज क्षीरसागर, गोरोबा लोखंडे, मोहन सुरवसे, संभाजी मस्के, वर्षा मस्के, केशरबाई महापुरे, मनीषा पुंड, सचिन कांबळे, विश्वजीत गव्हाणे, पिराजी साठे, आनंद वैरागे, जेष्ठ पत्रकार अशोक देडे, नाना कांबळे, मंगेश वैरागे, सुनील बसपुरे, ड. अंगद गायकवाड, जी.ए गायकवाड, सिताराम पवार आदी उपस्थित होते.

## कळगाव येथे पोल वाकल्यामुळे नागरीकांचा जीव धोक्यात

ताडकळस : येथून जवळच असलेल्या कळगाव येथील बालाजी इरबाजी वाव्हळे यांच्या घरालगत असलेला विद्युत पोल वाकला आहे. हा विद्युत पोल कधीही त्यांच्या घरावर कोळसळुन मोठा अनर्थ घडु शकतो. विद्युत तारांमुळे घरामध्ये शॉटसर्कीट देखील होऊ शकते. त्यामुळे हा विद्युत पोल तात्काळ हलवावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. कळगाव येथील वाव्हळे यांच्या घरा जवळील विद्युत पोल हा वाकलेला आहे. त्याच्या तारा घराच्या पत्र्या जवळ येत आहेत. त्यापासून घरात शॉर्टसर्किट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याची तात्काळ दखल घ्यावी असे महावितरणला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या संदर्भात कार्यकारी अभियंता महावितरण कार्यालय पूर्णा यांना दि.७ जून रोजी निवेदन देऊन सूचना केली होती. निवेदन देऊन एक महिना उलटूनही त्याबाबत महावितरण कार्यालयाकडून कुठलीही कार्यवाही न झाल्यामुळे महावितरण कार्यालय काही अनुचित प्रकार घडण्याची वाट बघत आहे का असा सवाल उपस्थित होत आहे. या गंभीर बाबीची महावितरण विभागाने लवकरात लवकर दखल घेऊन संबंधित समस्या सोडवावी अशी मागणी कळगाव येथील ग्रामस्थांतून होत आहे.

# मुरुडमधील बसस्थानकात आता सिमेंट रस्ता आमदार धिरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

## दोन कोटी रुपयांच्या निधीला मान्यता

लातूर / प्रतिनिधी :- महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर झालेल्या निधीतून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघामधील मुरुड येथे नवे बसस्थानक उभे राहत असून याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या बसस्थानक परिसरातील वाहनतळाच्या व रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटीकरण (२ कोटी) कामाचा शुभारंभ लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. मुरुड ग्रामस्थांची मागणी व विद्यार्थी प्रवाशांची सोय लक्षात घेऊन बसस्थानक वाहनतळाचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी शासनाकडे वेळोवळी पाठपुरावा केला. त्यातून दोन कोटी रुपयांच्या कामाला शासनाने मान्यता दिली. या निधीतून बसस्थानक परिसरातील वाहनतळाचे व रस्त्याचे काम आजपासून सुरू झाले आहे. याचा शुभारंभ करून आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांनी ग्रामस्थांशी व एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. पाणी बसस्थानकात येवू नये, यासाठी मुख्य रस्त्याच्या उंचीचा विचार करून बस स्थानकातील रस्ता बांधावा, याचे काम वेळेत व दर्जेदार पद्धतीने करावे. हे बसस्थानक वर्दळीचे ठिकाण







असल्याने प्रवाशांना त्रास होणार नाही, प्रवाशांना चिखलात उभे राहू लागू नये याबाबत योग्य ते वाहतूक करावे अशा सूचना आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांनी दिल्या. यावेळी दिलीपदादा नाडे, बी. एन. डोंगरे, विजय देशमुख, रविंद्र काळे, सुभाष घोडके, उद्धव सवासे, परिवहन महामंडळचे अभियंता अभिजित भोसले, अभयसिंह नाडे, आकाश कणसे, ईश्वर चांडक, मुरुड बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक बाळासाहेब देवकर, दिनेश नवगिरे, दीपक पठाडे आदीसह कॉंग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचा लातूर शहर जिल्हा अनुसूचित जाती विभाग शिष्टमंडळाने भेट घेऊन केला सत्कार



लातुर / प्रतिनिधी : – लातूर लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसला दणदणीत विजय मिळवून दिल्याबद्दल लातूर शहर जिल्हा अनुसूचित जाती विभाग शिष्टमंडळाने शनिवार दि. २७ जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला तसेच त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली. याप्रसंगी लातूर शहर जिल्हा अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे, माजी उपमहापौर कैलास कांबळे, भाऊसाहेब भडीकर, बब्रुवान गायकवाड, किरण बनसोडे, संजय सुरवसे, पवन गायकवाड, प्रमोद जोशी, पंकज सोनवणे, दयानंद कांबळे, आशुतोष मुळे, सुधा कांबळे, अनिता रसाळ, मिना टेंकाळे आदी उपस्थित होते.

## संपादकीय....

# तरल प्रतिभेचा कणखर साहित्यिक

ज्येष्ठ साहित्यिक, पर्यावरणवादी विचारांचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, हरित वसई संरक्षण समितीचे संस्थापक तथा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांचे गुरुवारी प्रदीर्घ आजाराने वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. केवळ वसईच नव्हे, तर राज्य आणि तमाम मराठी सारस्वतात एक मोठी पोकळी सोडून गेलेले फादर फ्रान्सिस दिब्रिटो हे ख्रिस्ती धर्मगुरू कमी आणि निसर्ग, सृष्टी तथा मानवतेचा ध्यास घेतलेले सर्वधर्मीयांचे पिता शोभावेत, असे व्यक्तिमत्त्व होते. ख्रिस्ती आध्यात्मिक धर्मगुरू, प्रतिभावान साहित्यिक, पर्यावरणासाठी लढा देणारे सामाजिक कार्यकर्ते आणि मराठी– ख्रिस्ती साहित्यातील दुवा असलेले साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचा वसईतील नंदाखाल ग्रामातील चेलारी या गावात शेतकरी कुटुंबात ८ डिसेंबर १९४३ रोजी जन्म झाला. येशू खिस्तांचा आदर्श, फादर बर्नर भंडारी यांच्यापासून मिळालेली प्रेरणा आणि साहित्यातून झालेल्या नश्वरतावादाच्या संस्कारातून त्यांनी धर्मगुरू होण्याचा निर्णय घेतला. गोरेगावच्या संत पायस महाविद्यालयातून त्यांनी धर्मगुरुपदाचा १० वर्षांच्या अभ्यासक्रम पूर्ण केला. १९७२ मध्ये त्यांनी धर्मगुरू म्हणून दीक्षा घेतली; मात्र साहित्य आणि शिक्षणाप्रतीची त्यांची आस्था कधी कमी झाली नाही. बी.ए. समाजशास्त्र, साहित्य आचार्य, धर्मशास्त्रात एम.ए. या पदव्या त्यांनी प्राप्त केल्या होत्या. ख्रिस्ती धर्माचा धर्मग्रंथ असलेले बायबलचे मराठीतील भाषांतर हे बोजड होते. बायबलचे सोप्या, सहज, सर्वांना समजेल अशा मराठीत भाषांतर करण्याचे इंद्रधनू त्यांनी उचलले. एक तप त्यांनी या भाषांतरावर काम केले. त्यातूनच सुबोध बायबल आज केवळ ख्रिस्तीच नाही, तर मराठी कुटुंबांच्या घराघरांत पोहोचलेला हा ग्रंथ आज मार्गदर्शक स्वरूपात पुढे येत आहे. ते रूढ अर्थाने ख्रिस्ती धर्मगुरू असले तरी त्यांनी सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार करणारे लेखन केले. आपल्या लेखन, वाणी आणि कृतीतून आयुष्यभर त्यांनी साहित्याशी आपले स्नेहबंध बांधून घेतले. त्यांचा संत साहित्याचा अभ्यास गाढा होता. संत साहित्याचा प्रभावही त्यांच्या लेखनावर कायम दिसून येतो. धर्म आणि साहित्यात समाजप्रबोधनाची सकारात्मक शक्ती आहे, यावर त्यांचा दृढविश्वास होता. याच सकारात्मक शक्तीचा पुरस्कार त्यांनी धर्म आणि साहित्यातून केला. ख्रिस्ती समाजाचे मुखपत्र असलेल्या 'सुवार्ता' या नियतकालिकाची धुरा त्यांनी दोन तपांहून अधिक काळ सांभाळली. हे केवळ समाजाचे मुखपत्र न ठेवता या नियतकालिकाला फादर दिब्रिटो यांनी सामाजिक, वैचारिक व धार्मिक सुसंवादाचे व्यासपीठ केले. धार्मिक सुसंवाद वाढविण्यासाठी त्यांनी सर्वधर्मीय सोहळे साजरे करण्याची प्रथा सुरू केली. त्यांच्या या साहित्याच्या सकस प्रवासामुळेच ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. सृजनशील साहित्यामुळे त्यांनी लेखक म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली. फादर दिब्रेटो यांनी ललित लेखनही केले. लेखनातून प्रतिबिंबित होणारी त्यांची तरलता, संवेदना प्रसंगी समाजात होणार्या अन्यायाच्या विरोधात उमटली. त्यांच्या याच स्वभावाचे दर्शन ९० ते २००० च्या दशकात वसईकरांना घडले. वसईत समाजविघातक प्रवृत्तींकडून जमिनी विक्रीच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या दहशतीला त्यांनी हरित वसई संरक्षण समितीच्या माध्यमातून चोख उत्तर दिले. पर्यावरणाची हानी करणार्या सिडकोच्या वसई विकास आराखड्याच्या विरोधात त्यांनी जनमानसात जागृती केली. त्याचा परिणाम वसईत चटई निर्देशांक मर्यादित केल्याने हरित वसईला संरक्षण मिळाले. वसईत अनधिकृत पाणी उपशाच्या विरोधातही त्यांनी पाणी बचाव महिला आंदोलन ही चळवळ सुरू केली. बागायती बचाव आंदोलन, एस.टी.चे खासगीकरण या विरोधात त्यांनी सनदशीर मार्गाने दिलेले लढे यशस्वी झाले. साहित्य प्रांतातील मुशाफिरीसाठी आणि सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. ख्रिस्ती–मराठी साहित्य संमेलन, उस्मानाबाद येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

# वि. स. पागे : ज्ञानवंत कर्मयोगी

देशासाठी पथदर्शक ठरलेल्या रोजगार हमी योजनेचे प्रणेते वि. स. पागे यांचा आज (२१ जुलै) जन्मदिन. त्यानिमित्त त्यांच्या वाटचालीचा आढावा– रवींद्र माधव साठे रोजगार हमी योजनेचे (रोहयो) जनक वि. स. पागे यांची आज (२१ जुलै) जयंती आहे. संसदीय कार्यपद्धतीत व विधिमंडळ कामकाजात ज्या परंपरा व संकेत आज रूढ झाले आहेत, ते रुजविण्यात पागे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. १९५२–१९६० अशी आठ वर्षे महाराष्ट्र विधान परिषदेत आधी सदस्य व त्यानंतर १९६०–१९७८ ही १८ वर्षे सलगपणे त्यांनी राज्याच्या या सर्वोच्च सभागृहाचे सभापतीपद सांभाळले. १९६२ –१९७८ या काळात ते राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्षही होते. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात बागणी गावी झाला. त्यांचे पूर्वज पेशव्यांचे सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन त्यांच्या पागेवर अधिकारी होते. त्यामुळे त्यांच्या घराण्याचे नाव कालांतराने 'पागे' असे झाले. घराण्याच्या वारशामुळे देशभक्ती त्यांच्या रक्तात भिनली होती. तासगाव येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. संस्कृत विषयात कला शाखेत पदवीधर झाल्यानंतर त्यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. लहानपणापासून ते काँग्रेस चळवळीकडे ओढले गेले. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी दारूगुत्यांवरील निदर्शनात सहभाग घेतला. १९३० च्या 'कायदेभंग चळवळीत' व १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात त्यांनी हिरिरीने भाग घेतला. त्यासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला. सत्यशोधक चळवळ व क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सुरू केलेल्या पत्री सरकारच्या चळवळीत पागे यांनी समन्वयाची प्रमुख भूमिका बजावली. काँग्रेस पक्ष संघटनेत त्यांनी सांगली जिल्हा चिटणीस, अध्यक्ष व पुढे अखिल भारतीय समिती सदस्य म्हणून काम केले. काँग्रेस पक्षावर त्यांची एवढी निष्ठा होती की त्यांनी स्वत:चे घर पक्ष कार्यालय म्हणून वापरण्यासाठी तयारी दर्शविली होती. ते अनेक वर्षे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे राजकारणात होते, तरी त्यांनी धर्म, अध्यात्म, नीती याचा आग्रह सोडला नव्हता. राजकारण आणि अध्यात्म यांची सांगड घालत राजकारणाचे अध्यात्मीकरण करता येते, हे आपल्या आचरणातून त्यांनी दाखवून दिले. पागे यांचे व्यक्तिमत्त्व चतुरस्र होते. ते थोर स्वातंत्र्यसैनिक, वकील, साहित्यिक, उत्तम संसदपटू, ग्रामीण आणि शेतीच्या अर्थशास्त्राचे अभ्यासक होते. महात्मा गांधीजींच्या विचारांचा त्यांच्यावर पगडा होता. ते संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक होते. मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. 'पहाटेची नौबत', 'अमरपक्षी' हे काव्यसंग्रह तसेच 'निवडणुकीचा नारळ', 'विश्वदर्शन' ही त्यांची नाटके व 'लोकमान्यांवरील भाषणे', 'बेकारी निर्मूलनातून ग्रामविकास' ही मराठी पुस्तके आणि ''अ डायलॉग विथ दी डिवाइन'' हे इंग्रजीतील पुस्तक आदी ग्रंथसंपदा म्हणजे त्यांच्या सिद्धहस्त लेखणीचा आविष्कार होता. ते स्वत: उत्तम गात तर असतच, त्याबरोबर हार्मोनियम व वीणाही उत्कृष्ट वाजवत. सहकाऱ्यांना, त्यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल ते नेहमी प्रोत्साहन देत. मग ते सभागृहातील सदस्याचे भाषण असो वा सभागृहाबाहेर केलेली कामगिरी असो. रा. सु. गवई, प्रा. ना. स. फरांदे, डॉ. अशोक मोडक यांना पागे यांच्याकडून मिळालेली कौतुकाची थाप ही वानगीदाखल उदाहरणे.




सभापतीपदाचा काळ सभापतीपदाच्या कार्यकाळात विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षात उत्तम प्रकारे त्यांनी समन्वय व संवाद ठेवला होता. त्यामुळे सभागृहात खेळीमेळीचे वातावरण राही व तेथील चर्चाही सकारात्मक व फलदायी होत असे. नि:स्पृहता व नि:पक्षपातीपणा हे त्यांचे नोंद घेण्याजोगे गुणविशेष. विधान परिषदेचे सभापती असताना काही काळ ते महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचेही अध्यक्ष होते. खादी मंडळास दिशा देण्यात त्यांची मोठी भूमिका राहिली आहे. मंडळाच्या वतीने ग्रामीण कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी कारागीर रोजगार हमी योजना त्यांच्या पुढाकारानेच चालू झाली. आज केंद्रातील 'प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना' याच योजनेचा परिपाक आहे. या मंडळाचा अहवाल किंवा त्याच्या कार्याविषयी मुद्दे सभागृहापुढे चर्चेस येत त्यावेळी ते जाणीवपूर्वक पीठासनावर न बसता उपसभापती किंवा तालिकेवरील अन्य सदस्यास पीठासनावर बसवत. उद्देश हा की खादी मंडळावरील चर्चा निकोप व्हावी व कोणावरही दडपण येऊ नये. आजच्या काळात असा पीठासीन अधिकारी मिळणे हे दुर्मीळच. सभापतीचा कार्यकाळ संपल्यानंतर १९७९–९० पागे हे रोजगार हमी परिषदेचे अध्यक्ष होते. शासनाने त्यासाठी त्यांना मंत्रीपदाचा दर्जा व अन्य सुविधा देऊ केल्या परंतु त्यांनी केवळ मासिक एक रुपया मानधनावर काम केले हे विशेष. राजकारणाबरोबरच, स्वयंसेवी क्षेत्र, सहकार, शिक्षण, दलित, श्रमिक व शेतकरी या क्षेत्रांचा व त्यातील समस्यांचा त्यांचा अभ्यास होता. सभागृहातील त्यांच्या भाषणांमधून याची प्रचीती येत असे. १९८७ मध्ये विधान परिषदेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षांत पुणे येथे टिळक स्मारक मंदिरात एक कार्यक्रम योजला होता. त्या कार्यक्रमात एका वक्त्याने महाराष्ट्रातील ८० टक्के खेडय़ांमध्ये वीज पोचल्याचे अभिमानाने सांगितले. वि. स. पागे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. समारोपाच्या भाषणात ते म्हणाले की, ''महाराष्ट्रात ८० टक्के खेडय़ांमध्ये वीज पोचली आहे, त्याबद्दल आनंदच आहे; परंतु या खेडय़ांतील ८० टक्के घरांमध्ये मात्र आज अंधार आहे, याचेही भान आपण ठेवले पाहिजे.'' ग्रामीण भागातील जनतेसाठी त्यांच्या अंत:करणात असलेली संवेदना यातून स्पष्ट होते. लोकशाहीवर त्यांचा गाढा विश्वास होता. संविधानातील मानवी हक्क व मूल्यांची जपणूक करण्याचा त्यांचा नेहमी प्रयत्न असे. १८ वर्षे सलगपणे पीठासीन अधिकारी म्हणून राहण्याचा त्यांनी विक्रम केला. विधिमंडळाची सभ्यता व शान वाढविण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. भारतात प्रतिवर्षी सर्व पीठासीन अधिकाऱ्यांची राष्ट्रीय परिषद होण्याचा एक पायंडा आहे. १९६८ मध्ये या परिषदेने नेमलेल्या एका समितीचे पागे यांनी अध्यक्षपद भूषविले होते. देशातील संसद व विधिमंडळातील कामकाजासंदर्भात येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना याबद्दल या समितीने चर्चा केली व त्यावर अहवाल सादर केला. आजही या अहवालातील माहिती विधिमंडळातील कामकाजासाठी सर्वदूर आधारभूत मानली जाते. सभापतीपदाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी विधिमंडळ कामकाज, त्याचे नियम आणि त्यातील उणिवांचा सखोल अभ्यास केला. विधिमंडळ कामकाजातील नियमांत त्यांनी २० दुरुस्त्या सुचविल्या. यांत स्थगन प्रस्तावाऐवजी नियम ९३ अन्वये सूचना देणे, अनियतदिन प्रस्तावाची तरतूद, अशासकीय कामासाठी एक निश्चित दिवस, एका दिवशी दोन ऐवजी तीन लक्षवेधी सूचना घेण्याची सुधारणा, घटनादुरुस्तीचे अनुमोदन व अनुसमर्थन विधानसभेप्रमाणे, विधान परिषदेतही होणे आवश्यक, अधिवेशनच्या अंतिम दिवशी मांडावयाच्या प्रस्तावाबाबतची सूचनावजा सुधारणा इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश होता. आज सदनांतील सदस्यांना वर नमूद केलेले हक्क व अधिकार प्राप्त झाले आहेत त्याचे सर्वस्वी श्रेय वि. स. पागे यांच्याकडे जाते. शेवटच्या माणसासाठी.. महाराष्ट्रातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना गरिबांतील गरीब किंवा या शृंखलेतील शेवटचा माणूस हा त्यांच्या विचारांचा केंद्रिबदू होता. रोजगार हमी योजनेची कल्पना त्यांना जी सुचली त्याची पार्श्वभूमी रोचक आहे. महाराष्ट्रातील गरिबी व दुष्काळ याचा विचार करताना त्यांनी आपल्या पत्नीस विचारले की 'प्रभा, आपल्या घरात किती पैसे शिल्लक आहेत?' त्यावर प्रभाताईंनी ''७०० रुपये असल्याचे सांगितले''. पागे यांनी पुन्हा पत्नीस विचारले की 'या शिल्लक ७०० रुपयांत शेतावर किती गडी राबू शकतील?' त्यावर प्रभाताई उत्तरल्या की ''सुमारे २० दिवस १४–१५ गडी सहज काम करू शकतील''. त्यावेळी महाराष्ट्रात स्व. वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. पागे यांनी मुख्यमंत्र्यांना त्वरित पत्र लिहिले 'मा. मुख्यमंत्री साहेब, माझ्या शेतावर ७०० रुपयांत १४–१५ दिवस मला २० गडी मजुरीला लावता येत असतील तर मग महाराष्ट्र सरकारने १०० कोटी बाजूस काढले तर किती मजुरांना काम देता येईल?'' मुख्यमंत्र्यांनी पागे यांना मुंबईत बोलवून घेतले. कल्पना चांगली परंतु १०० कोटी कुठून आणायचे हा प्रश्न होता. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षातील मंडळीसह विचारविनिमय करण्यासाठी बैठक बोलाविली. विधानसभेत कृष्णराव धुळप हे विरोधी पक्षनेते होते. त्यांनीही या योजनेचे स्वागत केले व ते म्हणाले की ''नाईक साहेब, गरीब जनतेस या योजनेमुळे काम मिळत असेल तर या योजनेसाठी १०० कोटी रुपये उभे राहण्यासाठी विधानसभेत आम्ही कर प्रस्ताव घेऊन येतो.'' जगाच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासात सत्ताधारी पक्षास संपूर्णपणे मदत करण्यासाठी कर प्रस्ताव आणण्याचा महाराष्ट्रात झालेला हा प्रथम प्रयोग. रोजगार हमी विधेयक ८ ऑगस्ट १९७७ रोजी एकमताने रोजगार हमी विधेयक संमत झाले. त्यावेळी रूढ संकेत बाजूस ठेवून सभापती पागे यांनी विशेष प्रसंग म्हणून विधेयकाबद्दल मनोगत व्यक्त केले. ते म्हणतात ''माझ्या जीवनाचे जीवित कार्य, मिशन म्हणून मी हे कार्य केले आहे. मी आशा करतो की, भारतातील सर्व प्रांत या दृष्टीने वाटचाल करतील व केंद्र सरकार या गोष्टीला आशीर्वाद देईल''. २१ डिसेंबर २००४ रोजी डॉ. मनमोहन सिंग सरकारने राष्ट्रीय रोजगार हमी कायदा–२००४ हे संसदेत मांडलेले विधेयक म्हणजे पागे यांच्या स्वप्नाची पूर्ती झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या योजनेमुळे ग्रामीण क्षेत्रात अकुशल व अंग– मेहनत करणाऱ्या कोणत्याही प्रौढ व्यक्तीस रोजगाराची हमी व काम मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. आज त्यामुळेच आपल्यास रस्ते, पाझर तलाव, नाला बंडिंग व विहिरी खोदकाम ही कामे दृष्टिपथास पडतात. रोहयो मागची भूमिका मांडताना पागे म्हणतात की, ''आजवरच्या नियोजनात बेकारीचे निर्मूलन हे कधीच उद्दिष्ट नव्हते. त्यास कायम दुय्यम दर्जा दिला गेला. सर्वांना काम हेच आपले यापुढे ब्रीद असले पाहिजे. सुरुवातीस ही योजना एका गावात प्रायोगिक स्वरूपात करण्यात आली. त्यानंतर १०० गावांत व पुढे २००० गावांत तिचा विस्तार झाला. १९७२ मध्ये संपूर्ण राज्यात ही कार्यान्वित झाली. १९७२ मधील भीषण दुष्काळानंतर काही वर्षे ती स्थगित होती, परंतु टंचाईची परिस्थिती संपल्यावर ती योजना पुन्हा नव्या जोमाने सुरू झाली.'' भारतीय राज्य घटनेच्या ४१ व्या कलमात 'काम करण्याचा हक्क' ( फ्रऋँ३ ३ ६१') याचा उल्लेख आहे. या तत्त्वाच्या पूर्तीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी रोहयो हे प्रथम पाऊल होते. पागे यांनी या योजनेची मूलभूत तत्त्वे मांडली होती. तळागाळातील लोक, अकुशल प्रौढ व्यक्ती हा केंद्रिबदू, योजनेत सर्वात्मक दृष्टिकोन, वेतन हे कामाचा दर्जा व प्रमाण यांच्याशी निगडित असणे, शासन व लाभार्थी यांच्यामध्ये दलाल असता कामा नये, पुरुष व स्त्रिया असा भेदभाव न करता ''समान काम, समान दाम'', आदींचा समावेश यात आहे. या योजनेबद्दल पागे यांची भूमिका लवचीक होती. या योजनेची वेळोवेळी समीक्षा होण्याची आवश्यकताही त्यांनी प्रतिपादित केली होती. त्यांचे म्हणणे असे की, काम करण्याचा हक्क मिळणे ही योजना नसून ते राज्याच्या धोरणाचे मार्गदर्शक तत्त्व आहे. ते तत्त्व आहे, धोरण आहे, योजना आहे तसा उपक्रमही आहे. त्यामुळे काळानुरूप त्याचे स्वरूपही बदलू शकते. गरीब व पीडित ग्रामीण जनतेविषयी त्यांच्या मनात आस्था होती. महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्य या संकल्पनेचे ते पुरस्कर्ते होते. त्यातून रोहयोचा उगम झाला. ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना कामाची हमी देणारी जगातील एकमात्र योजना म्हणून आज गणली जाते. महाराष्ट्रात कोटय़वधी रुपयांची कामे या योजनेमधून झाली. ही योजना म्हणजे दारिद्रय़निर्मूलन आणि ग्रामीण विकासास गती देणारे प्रभावी साधन आहे. केंद्रात सुरू असलेली 'मनरेगा' याच योजनेचे विस्तारित स्वरूप आहे. ज्या समाजातील लोक स्वत:च्या परिस्थितीबाबत समाधानी असून पददलितांच्या उत्थानासाठी काही प्रयत्न करतात, त्या समाजाची नेहमी प्रगती होते. रोजगार हमी योजनेमागची वि. स. पागे यांची नेमकी ही सैद्धांतिक भूमिका होती. पुणे विद्यापीठाच्या गीतामध्ये प्रारंभी असे म्हटले आहे की 'ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान.' पागे यांच्या जीवनास हे बोधवाक्य तंतोतंत लागू पडम्ते.

# 'कारगिल' संघर्षाची आणि संयमाची पंचविशी

पंकज फणसे, लेखक जवाहरलाल नेहरू, विद्यापीठात रिसर्च स्कॉलर असून तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय संबंध हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. इतिहास उगाळण्याचा खरा हेतू हा पराक्रमाचे गोडवे गाण्यापेक्षा भविष्याच्या वाटचालीचे धडे गिरविणे हा असला तर समाजाचे देहभान जागृत राहण्याची शक्यता दुणावते. कारगिल संघर्ष हा असाच एक अध्याय! १९९९ च्या मे महिन्यात सुरू झालेल्या या युद्धाची विजयी सांगता २६ जुलै रोजी झाली. कारगिलच्या रौप्य महोत्सवानिमित्त भारताच्या सामरिक बदलांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न! कारगिल युद्ध हा युद्धापेक्षाही जागतिक मापदंड झुगारून अण्वस्त्रधारी बनलेल्या दोन नवआण्विक शक्तीतील प्रत्यक्ष संघर्ष होता. अण्वस्त्रप्रसारबंदी कायद्यान्वये केवळ पाच देशांना मान्यता असताना भारत आणि पाकिस्तानने केलेली आण्विक चाचणीची 'आगळीक' म्हणजे पाश्चिमात्य राष्ट्रांसाठी माकडाच्या हाती कोलीतच होते! त्याला प्रत्यक्ष संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाल्यानंतर दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रे काय भूमिका घेतात आणि उर्वरित जग आणि संयुक्त राष्ट्रासारख्या संस्था संघर्ष निवारणासाठी कोणती पावले उचलतात याकडे सगळ्यांचे लक्ष होते. सर्वात पहिला प्रश्न असा उपस्थित होतो की प्रत्यक्ष संघर्षाची वेळच का आली? तत्कालीन पाकिस्तानी लष्करप्रमुख परवेज मुशर्रफ यांनी आपल्या लष्करी सहकाऱ्यांना हाताशी धरून काश्मीर प्रश्नावर निर्णायक तोडगा काढण्यासाठी कारगिल क्षेत्रात असणाऱ्या उंच टेकड्यांवर ताबा मिळविण्याचा निर्णय घेतला. जेणेकरून याद्वारे श्रीनगर– लेह महामार्गावर नियंत्रण मिळवून लडाखला भारतीय संपर्कापासून अलिप्त करता येईल. अशीच एक योजना बनिहाल खिंड परिसरात राबवून काश्मीर खोऱ्याला जम्मूपासून वेगळे करून नियंत्रण मिळविण्याचा डाव होता. बऱ्याच अंशी आता या सिद्धांताला मान्यता मिळाली आहे की ही योजना मुशर्रफ यांनी राजकीय नेतृत्वाला गाफील ठेवून आखली होती. मात्र स्थानिक गुराख्यांनी सैन्यदलाला दिलेल्या माहितीच्या आधारे ही घुसखोरी उघडकीस आली आणि संघर्षाला सुरुवात झाली. काही विश्लेषकांच्या मते कारगिल हे युद्ध नसून संघर्ष होता. प्रत्यक्ष सीमा रेषेच्या ठरावीक परिसरात मर्यादित पातळीवर झालेल्या या युद्धामध्ये दोन्ही देशांकडची एक दशांशही साधन सामग्री वापरली गेली नाही आणि या संघर्षाची परिणती मोठ्या युद्धामध्ये झाली नाही. मात्र हे संघर्षाचे संयमित स्वरूपच भारतासाठी आगामी काळात मुत्सद्देगिरीचे वरदान ठरले. तत्कालीन लष्करप्रमुख वेद प्रकाश मलिक यांनी पंतप्रधान वाजपेयी यांच्याकडे हवाई दलाच्या मदतीची मागणी केल्यावर राजकीय नेतृत्वाने हवाई दलाला प्रत्यक्ष ताबारेषा न ओलांडण्याची अट घातली होती. काही महिन्यांपूर्वी दोन्ही देशांत झालेल्या लाहोर कराराचे उल्लंघन करणाऱ्या पाकिस्तानची आगळीक संतापजनक असताना, युद्धभूमीवर घुसखोरांनी मोक्याच्या जागा बळकावलेल्या असताना पराकोटीचा संयम बाळगून भारताला घुसखोरांना हुसकावून लावण्यात यश मिळाले. दुर्दैवाने १९७१ च्या युद्धापेक्षा जास्त वीर या संघर्षामध्ये धारातीर्थी पडले तरीही भारतीय नेतृत्वाने दुसरी आघाडी न उघडता संघर्षाची व्याप्ती वाढणार नाही याची दक्षता घेतली. त्याचबरोबर पाच हजार मीटरपेक्षा उंचीवरील युद्धभूमीवर पराक्रम गाजवून भारताने आपले सामर्थ्य सिद्ध केले. युद्ध समाप्तीनंतर अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी भारत दौऱ्यात या संयमाचे कौतुक केले आणि भारत अमेरिका द्विपक्षीय संबंधांसाठी नवी कवाडे उघडली गेली. त्या पूर्वीचा इतिहास पाहता पाकिस्तानची बाजू हा द्विपक्षीय संबंधांसाठी निर्णायक घटक होता. मात्र कारगिलनंतर दोन्ही देशांत विश्वासाचे नवे अध्याय लिहिण्यास सुरुवात झाली आणि आगामी काळात नवीन राष्ट्राध्यक्षांबरोबर हे संबंध उत्तरोत्तर दृढ होत गेले. आणि अमेरिका भारताचा महत्त्वाचा संरक्षण भागीदार बनला. शेवटी आंतरराष्ट्रीय राजकारणात संयम लाभकारकच ठरतो! या मर्यादित संघर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे तो सर्जिकल स्ट्राइकच्या स्वरूपात दोन्ही देशांतील सामान्य प्रतिसाद बनत आहे. २०१९ चा बालाकोट हवाई हल्ला ही भारताची १९७१ नंतर सीमारेषा ओलांडण्याची पहिलीच वेळ होती. मर्यादित उद्दिष्ट, अचूक लक्ष्य आणि किमान सामग्री यांचा वापर करून शेजारी देशावर आण्विक जरब राहील, मात्र प्रत्यक्ष संघर्षाचा भडका उडणार नाही अशा प्रकारे हल्ल्याचे नियोजन केले गेले. कारगिलनंतर ऑपरेशन पराक्रम आणि कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रिन (पाकिस्तानच्या संभाव्य आण्विक हल्ल्याला उत्तर देण्यासाठी सीमारेषेवर शीघ्र सैन्यदल तैनात करण्याचे धोरण) या भारताच्या धोरणांना पाकिस्तानने रणनीतीक आण्विक शस्त्रांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेऊन प्रत्युत्तर दिले. मात्र सध्या या सर्व बाबी बासनात गेल्याचे दिसत असून सर्जिकल स्ट्राइक ही नवी रणनीती बनली आहे. दुसरीकडे भारत–पाकिस्तान द्विपक्षीय संबंध कमालीचे ताणले गेलेले असतानाही चर्चेच्या फेऱ्या सुरूच राहिल्या. कारगिल घटनेच्या आधी फेब्रुवारीमध्ये लाहोर घोषणापत्र, दिल्ली–लाहोर बस सेवेचा प्रारंभ आणि प्रत्यक्ष पंतप्रधान वाजपेयींचा त्यातून प्रवास आदी गोष्टींमुळे द्विपक्षीय संबंधांत कमालीची सुधारणा झाली होती. ऑक्टोबर १९९९ मध्ये मुशर्रफ यांनी शरीफ यांना हुसकावून लावल्यानंतर केवळ दीड वर्षात आग्रा येथे वाजपेयी–मुशर्रफ यांच्यात शिखर परिषद झाली. पाकिस्तानच्या राजकीय – लष्करी क्षेत्रातील बऱ्याच घटकांना भारताबरोबरच्या शांततेशी वावडे आहे. त्यामुळे असे पाहावयास मिळते की शांततेचे आशादायक चित्र निर्माण होते, तेव्हा विघातक गोष्टी घडविल्या जातात. फेब्रुवारी १९९९ नंतर कारगिल, आग्रा, २००१ नंतर डिसेंबरमध्ये संसदेवर हल्ला, सरकारच्या काळात सहकार्याने पुन्हा उचल खाल्लेली असताना अतिरेकी हल्ल्यांच्या मालिका आणि भीषण असा २००८ चा हल्ला, २०१४ मध्ये सत्तेमध्ये आल्यानंतर शपथविधीसाठी निमंत्रण, शरीफ यांच्या वाढदिवसानिमित्त मोदी यांची विस्मयकारक लाहोर भेट या सकारात्मक गोष्टींनंतर उरीच्या लष्करी तळावर २०१६ मध्ये हल्ला या सगळ्या गोष्टी याचेच प्रतीक आहेत. त्यामुळे पाकिस्तानबरोबरच्या चर्चेची उपयुक्तता वादग्रस्त आहे. काही अभ्यासकांच्या मते चर्चेशिवाय गत्यंतर नाही. कारण वाजपेयींच्या शब्दांत सांगायचं तर 'आपण आपले मित्र निवडू शकतो, शेजारी नाही!' पण एकूणच कारगिलनंतर पाकिस्तानचा रोख प्रत्यक्ष संघर्षापेक्षा, निर्णायक घाव घालण्यापेक्षा, दहशतवादी हल्ले आणि घुसखोरीद्वारा सतत छोटे घाव घालून रक्तबंबाळ करण्यावर दिसला आहे. भारताचा विचार करायचा झाला तर युद्धासाठी प्रशिक्षित असलेले लष्कर दहशतवादी हल्ल्यांना उत्तर देताना आपले सर्वोत्तम जवान आणि अधिकारी हकनाक गमावत आहे. अशा काळात वाजपेयींचा संघर्ष निवारण्याचा चर्चात्मक दृष्टिकोन राजकारणातील संयमाची परिसीमा दर्शवितो. २३ पक्षांचे कडबोळे सरकार चालविणाऱ्या, आर्थिक निबंधांनी पिचलेल्या वाजपेयींची कदाचित ही राजकीय अपरिहार्यतादेखील असू शकते. शासकीय पातळीवर कारगिल पुनरावलोकन समिती अहवाल (२०००) आणि मंत्री गट अहवाल (२००१) यांच्या शिफारशी भारतीय लष्करी सुधारणांसाठी परिणामकारक ठरल्या. बोफोर्स प्रकरणानंतर मरगळलेली शस्त्र खरेदी पुनरुज्जीवित करण्यात या अहवालाचा हातभार होता. तसेच तिन्ही दलांचे नेतृत्व करण्यासाठी संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) या हुद्द्याची निर्मिती, सैन्य दलांचे एकत्रीकरण, एकजुटीकरण आणि थिएटरायझेशन साठी प्रयत्न, अग्निवीर योजनेद्वारा जवानांचे वय कमी ठेवण्यावर भर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्यावर भर आणि त्यासाठी शीत युद्धाचे ओझे बाजूला ठेवून, व्यवहारवादी दृष्टिकोनाचा स्वीकार करून आंतरराष्ट्रीय भागीदारी इत्यादी गोष्टी या वरील अहवालांचे परिणाम आहेत. मर्यादित युद्धनीती प्रगल्भ होत असताना पाकिस्तानबरोबरील पारंपरिक युद्धाचा धोका टळलेला नाही. दहशतवादी काश्मीरमध्ये रक्ताचे शिंपण करत आहेत. अलीकडील काळात काश्मीरमधून जम्मूमध्ये स्थलांतरित झालेल्या हिंसक कारवाया या सीमेपलीकडील बदललेल्या डावपेचांचे लक्षण आहे. त्याच वेळी १९९९ आणि २०२४ या २५ वर्षांच्या काळात दुर्बल, लोकांना जबाबदार नसणारी लोकशाही हे पाकिस्तानच्या राजकीय व्यवस्थेचे वैशिष्ट्य राहिले आहे. जबाबदारीचा हा अभाव लष्करी – राजकीय शक्तीच्या केंद्रीकरणाबरोबर सम्मीलित झाल्यास नेतृत्वाला भलते धाडस करण्यासाठी उद्युक्त करण्याचीदेखील शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी कारगिल हा केवळ एक यशस्वी पडाव होता, सीमेपलीकडील भारतविरोधी शक्तींचा पाडाव नाही याची जाणीव असणे गरजेचे आहे. २५ वर्षांनंतर प्रश्न तसाच नाही, तर एव्हाना गुंतागुंतीचा झाला आहे. शांततेसाठी दोन्ही देशांदरम्यान कटुता संपणे गरजचे आहे.



# हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांपासून दूर राहायचेय? मग तज्ज्ञांनी सांगितलेल्या 'या' चार सवयी टाळा

जगभरात हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतेय. चालता-बोलता व्यक्ती अचानक हृदय विकाराच्या झटक्यामुळे मरण पावतोय, त्यामुळे हृदयविकार हा आजार केवळ भारतासाठी नाही तर जगभरासाठी एक चिंतेचा विषय आहे. कारण केवळ वृद्धच नाही तर तरुण मुलंदेखील या आजारामुळे ग्रासलेली दिसत आहेत.



व्यक्तीच्या धमन्यांमध्ये चरबी आणि कोलेस्ट्रॉल जास्त प्रमाणात जमा झाल्यामुळे हृदयापर्यंत रक्त प्रवाह पोहोचण्यात अडचणी येतात. अशा परिस्थितीत व्यक्तीला हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. यामुळे हृदयरोगतज्ज्ञ काही सवयी आणि पदार्थ टाळण्याचा सल्ला देतात, ज्यामुळे तुम्ही हृदयाची नीट काळजी घेऊ शकता. याविषयी हृदय शल्यचिकित्सक डॉ. जेरेमी लंडन यांनी इन्स्टाग्रामवर एक पोस्ट केली आहे, ज्यात त्यांनी हृदयरोग टाळण्यासाठी कोणत्या सवयी टाळल्या पाहिजेत हे सांगितले आहे.

हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांपासून दूर राहण्यासाठी टाळा 'या' चार सवयी

१) सिगारेट ओढणे टाळा.

२) दारू पिणे टाळा, कारण तुमच्या शरीरातील प्रत्येक पेशीसाठी अल्कोहोल विषारी आहे.

३) शीतपेये पिणे टाळा.

४) मैद्यापासून बनवलेले अन्नपदार्थ खाणे टाळा.

डॉ. लंडन म्हणाले की, तुम्ही आहाराचे योग्य प्रमाणात सेवन केल्यास ८० टक्के वजन नियंत्रण ठेवू शकता. म्हणजे वजन नियंत्रणात ८० टक्के भाग हा आहारावर अवलंबून असतो, तर २० टक्के भाग व्यायाम आहे; त्यामुळे व्यक्तीने काहीही खाताना जरा विचार करून खाल्ले पाहिजे.

हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधित आजारात या सवयींमुळे कसे नुकसान होते? जाणून घ्या

या विषयावर मुंबईतील सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे सल्लागार कार्डियाक सर्जन डॉ. बिपीनचंद्र भामरे इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना म्हणाले की, अति मद्यपान किंवा धूम्रपान केल्याने उच्च रक्तदाब होऊ शकतो, ज्याला हायपरटेंशन असेही म्हणतात. उच्च रक्तदाबामुळे एखाद्या व्यक्तीच्या हृदयाच्या स्नायूवर दबाव येऊ शकतो, परिणामी हृदयविकाराचा झटका येतो.

सॉफ्ट ड्रिंक्सला 'लिक्विड डेथ' असेही म्हणतात, कारण त्यात जास्त प्रमाणात साखर असते; ज्यामुळे तुमच्या हृदयाच्या आरोग्याला हानी पोहोचते. पास्ता, ब्रेड, स्नॅक्स आणि कपकेक यांसारख्या मैद्याच्या पिठापासून बनवलेल्या खाद्यपदार्थांमुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. कारण तुमचे शरीर हे पदार्थ खाल्ल्यानंतर त्याचे साखरेत रूपांतर करते आणि चरबीच्या स्वरूपात साठवते. यामुळे पोटाभोवती चरबी जमा होऊ शकते, ज्यामुळे हृदयाचे आरोग्य खराब होऊ शकते. यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो, असेही डॉ. भामरे म्हणाले.

यामुळे तुम्हाला हृदयाच्या आरोग्याशी संबंधित तुमच्या चिंता आणि हृदयविकाराचा धोका कसा कमी करावा याविषयी डॉक्टरांचा सल्ला घ्या, त्यांच्याशी चर्चा करा, तुमचे हृदय आणि एकूणच आरोग्य सुधारण्यासाठी ते तुम्हाला एक योग्यप्रकारचा आहार खाण्याचा सल्ला देऊ शकतात.

छातीत दुखणे, थकवा येणे, डोके दुखणे, थंड घाम येणे, मळमळ होणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. व्यक्तीने नियमित व्यायाम केला पाहिजे, यासाठी रोज ४० मिनिटे चालणे किंवा सायकल किंवा पोहणे गजरेचे आहे, असेही डॉ. भामरे म्हणाले.

## लसूण आणि ग्लास स्किन, खरंच फायदा होतो का?

सुंदर त्वचेसाठी विविध उपचार गेली वर्षानुवर्षे आपण पाहात आणि ऐकत आहोत. किमान तीन महिने कच्ची लसूण सकाळी उठल्या उठल्या खा आणि नितळ 'ग्लास' स्किन मिळवा! असे सांगणारे व्हिडीओज गेल्या काही काळात व्हायरल झाले आहेत. त्यानिमित्ताने आजचा लेख पल्लवी माझी स्किन अचानक खूप लाल झालीये. पोटात जळजळ पण होतेय. काल मी डायजिन घेतलंय दोन्ही जेवणाआधी वेदिका काळजीच्या स्वरात सांगत होती. आपण प्रत्यक्ष भेटू शकतो का? आणि मुख्य म्हणजे डॉक्टरना भेटलीस का? मी काळजीने विचारलं. अजून नाही भेटलीये. अॅक्चुयली मी गेले आठवडाभर दिवसा सकाळी उठून लसूण खायला सुरुवात केलीये. त्यामुळे झाला असेल का? पण कशासाठी? मी ते ग्लास स्किनबद्दल वाचलं. म्हटलं करून पाहूया. तिच्या या वाक्यावर नक्की काय बोलावं, हे मलाच समजेना त्यामुळे झालं असेल का? अर्थात! काही लोकांना लसूण उष्ण पडू शकते मग आता काय करूया? आधी भरपूर पाणी पिणे. त्यात पुदिना, काकडी भरपूर खा. आणि शक्य असल्यास स्किन स्पेशालिस्टना भेटून ये. लसणीतून मिळणारे पोषण समाज माध्यमांवर ट्रेण्डिंग होणाऱ्या व्हिडीओ किंवा आरोग्यविषयक सल्ल्याला बळी पडलेल्या अनेकजणींपैकी वेदिका होती. यानिमित्ताने हे ग्लास स्किन आणि त्याबद्दल जाणून घेऊ. लसणामध्ये एलिन, सायक्लो एलिन, स-एलील - ल-सिस्टीन, एस -मिथाईल - एल सिस्टीन, एस -इथलीसिस्टिन, एस -१ -प्रोपोनील - एल सिस्टीन, फ्रुकटो सिल -अरजीनीन अॅण्ड बीट क्लोरोजेनीन, एल आरजीनीन, एल सिस्टीन आणि एल मिथिओनिन असतं. १०० ग्राम लसणामध्ये ९२ % रायबोफ्लेवीन, २५% लोह, ७३% मॅग्नेशिअम असतं त्यामुळे दिवसातून किमान २- ३ लसणीच्या पाकळ्या खाल्ल्या तरी त्यातून मुबलक प्रमाणात पोषण मिळतं. लसणीचे फायदे लसूण आहारात नियमितपणे समाविष्ट केल्यामुळे अनेक फायदे होतात ते आधी जाणून घेऊ - १) उच्च रक्तदाब असणाऱ्यांसाठी लसूण खाल्ल्यामुळे रक्तदाब कमी होतो २) पचनाचे विकार कमी होतात ३) केसगळती कमी होते ४) चेहऱ्यावरील मुरुमे कमी होतात ५) यकृत निरोगी ठेवण्यासाठी लसूण पावडर गुणकारी ठरते ६) त्वचेचे विकार कमी करणाऱ्या अनेक औषधांमध्ये लसूण अर्क वापरला जातो ७) नियमितपणे लसूण खाल्ल्याने स्मृतिभ्रंशाचा आजार होत नाही.

# किडनी खराब होण्याआधी शरीर देतं 'हे' ८ संकेत; वेळीच ओळखा अन् मूत्रपिंड निकामी होणे टाळा

मूत्रपिंड म्हणजेच किडनी हा आपल्या शरीराचा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. किडनी निकामी होण्याची समस्या गेल्या काही वर्षांत अधिक प्रमाणात दिसून येत आहे. किडनीचा आजार जितका धोकादायक आहे, तितकाच हा आजार उशिरा ओळखला जातो. त्यामुळे किडनीची थोडीशी समस्यादेखील किडनी पूर्णपणे खराब होण्याचे कारण बनते. किडनी फेल्युअरची लक्षणे इतकी सौम्य असतात की, हा आजार वाढत नाही तोपर्यंत बहुतेक लोकांना काही फरक जाणवत नाही. किडनी बिघडण्याची काही चिन्हे आहेत, जी तुम्हाला वेळेवर सांगतील की तुमची किडनी खराब होऊ लागली आहे आणि तुम्ही त्याकडे लवकर लक्ष दिले पाहिजे. या विषयावर दी इंडियन एक्स्प्रेसने माहिती दिली आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.



किडनी हा आपल्या शरीरातील महत्त्वपूर्ण अवयवांपैकी एक आहे. त्यामुळे त्याकडे लक्ष देणे फार महत्त्वाचे आहे. कारण- किडनी आपल्या शरीरात गाळणीप्रमाणे काम करते. किडनी आपल्या शरीरातील टाकाऊ घटक वेगळे करून, ते शरीराबाहेर टाकण्याचे काम करीत असते. त्यामुळे शरीरातील हानिकारक विषाक्त घटक बाहेर निघण्यास मदत होते. किडनीचे कार्य सुरळीत चालू राहण्यासाठी शरीर डिटॉक्स होणे फार महत्त्वाचे आहे. जेव्हा किडनीत कोणत्याही प्रकारचे संक्रमण किंवा बिघडण्याची प्रक्रिया सुरू होते, तेव्हा ते शरीराला विविध प्रकारचे 'संकेत' (सिग्नल्स) देते. मूत्रपिंडाच्या आजाराची सर्वांत मोठी समस्या ही आहे की, जोपर्यंत हा आजार जास्त प्रमाणात पसरत नाही तोपर्यंत व्यक्तीला वेदना जाणवत नाहीत.

निरोगी शरीरासाठी किडनी निरोगी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा जेव्हा मूत्रपिंडात कोणत्याही प्रकारचा संसर्ग होतो तेव्हा तेव्हा मूत्रपिंड तुम्हाला काही खास संकेत देऊन सावध करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे मूत्रपिंडाच्या आजाराशी संबंधित चिन्हे ओळखा. कारण- एकदा किडनीचा आजार बळावला की, जीवालाही धोका निर्माण होतो. जर तुम्हाला तुमची किडनी खराब होऊ द्यायची नसेल, तर वेळीच ओळखा खाली दिलेले संकेत :

१. खाज सुटणे किडनीच्या समस्या आपल्या शरीराच्या अनेक अवयवांवर थेट परिणाम करतात. त्यामध्ये त्वचेचाही समावेश होतो. त्वचेमध्ये कोरडेपणा आणि खाज येणे हेदेखील किडनी विकाराचे मुख्य लक्षण आहे.

२. स्नायूंमध्ये तीव्र वेदना स्नायूंमध्ये तीव्र वेदना होणे हे किडनीच्या आजाराचे पहिले लक्षण असू शकते.

३. मळमळ आणि उलटी किडनीच्या नुकसानीमुळे मळमळ, उलट्या व भूक न लागणे यांसारखी गॅस्ट्रोइंटेस्टायनल लक्षणेदेखील दिसू शकतात.

४. भूक न लागणे शरीरात विषारी पदार्थ आणि कचरा जमा झाल्यामुळे तुमची भूक कमी होऊ शकते. हे मूत्रपिंड निकामी होण्याचे धोकादायक लक्षण आहे; ज्याकडे कोणाचेही लक्ष नसते.

५. पायांमध्ये सूज पायांना सूज येणे हे किडनी खराब असण्याचे लक्षण असते. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करणे टाळले पाहिजे.

६. वारंवार लघवी होणे वारंवार लघवी होणे हे मूत्रपिंड निकामी होण्याचे लक्षण आहे. मूत्रपिंडाच्या समस्येच्या बाबतीत, व्यक्तीला खूप वेळा लघवी करण्याची तीव्र इच्छा जाणवते. ही स्थिती किडनीला नुकसान पोहोचवते.

७. श्वास घेण्यास त्रास आपण श्वास घेऊ शकत नाही असे वाटणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे हे मूत्रपिंडाच्या आजाराचे संभाव्य लक्षण आहे. श्वास घेण्याची क्षमता कमी होणे हेदेखील किडनी खराब असल्याचे एक लक्षण आहे.

८ झोप न येणे झोप न येणे आणि अपरात्री जाग येणे हे एक किडनी खराब असण्याचे लक्षण आहे.

तुमची किडनीने अचानक काम करणे थांबवल्यास (तीव्र मूत्रपिंड निकामी), तुम्हाला खालीलपैकी एक किंवा अधिक लक्षणे दिसू शकतात

पोट दुखणे पाठदुखी अतिसार ताप नाकातून रक्त येणे पुरळ उलट्या होणे अशा प्रकारे किडनी खराब होण्याचे संकेत वेळीच ओळखून तुम्हाला धोका टाळता येऊ शकतो.

# वातप्रकोप नेमका कोणत्या कारणांनी होतो?

वास्तवात रुक्षत्व (कोरडेपणा), शीतत्व (थंडावा), खरत्व, चलत्व (गतिमानता), सूक्ष्म, लघु (हलका) हे वाताचे गुण आहेत. मात्र या सर्व गुणांमध्ये कोरडेपणा हा वाताचा सर्वात महत्त्वाचा गुण आहे असे सुश्रुतसंहितेचे भाष्यकार आचार्य डल्हण सांगतात. साहजिकच कोरडेपणा हा वाताचा मुख्य गुण असल्याने त्याचा अतिरेक झाला की, तो मुख्य दोष ठरतो. शरीरामध्ये वाढणार्या कोरडेपणालाच आयुर्वेदाने शरीरामध्ये वात वाढण्याचे महत्त्वाचे कारण मानले आहे, त्याचा हा ग्रंथसंदर्भ.

स्नेहाचा अभाव कोरडेपणा वाढवणारा रुक्ष (कोरड्या) गुणांचा आहार आणि विहार (जीवनशैलीतल्या चुका) यांमुळे शरीरामध्ये कोरडेपणा अवास्तव प्रमाणात वाढून कोरड्या गुणांचा वात वाढवतो, असे हे सरळ गणित आहे. वातप्रकोपास कोरडा (रुक्ष) आहार कारणीभूत होतो, असे म्हणताना इथे प्रत्यक्षात ज्यांच्यामध्ये स्नेहाचा (म्हणजे तेलतुपाचा) अभाव असलेले, ओलावा नसलेले असे स्पर्शाला कोरडे पदार्थ तर अपेक्षित आहेतच. उदा.- कुरमुरे, लाह्या,कोरडी चपाती वा भाकरी, भाजलेले पापड, टोस्ट-खारी- बटर, वगैरे. मात्र त्याचबरोबर पचनानंतर शरीरातला स्नेह आणि ओलावा खेचून घेणारे आणि कोरडेपणा वाढवणारे पदार्थ असाही अर्थ अपेक्षित आहे.

कोरडे अन्न २१व्या शतकामधील शहरी जीवनशैलीमधला एक महत्वाचा दोषही आपण या निमित्ताने समजून घेतला पाहिजे. कामावर जाणारे लाखो लोक सकाळी तयार केलेले जेवण डब्यामध्ये भरुन घेऊन जातात व दुपाराच्या लंचब्रेकमध्ये ते रुखे- सुखे जेवण खातात. अगदी मंत्र्या-संत्र्यापासून चपराशापर्यंत आणि कॉर्पोरेट मंडळींपासून म्युनिसिपाल्टीपर्यंत सर्वांनाच असे रुखे-सुखे जेवण खावे लागते. अहो, शाळेत जाणार्या वाढत्या वयाच्या मुलांनासुद्धा डब्यातले कोरडे पडलेले अन्न आपण देतो, तिथे इतरांची काय कथा? अशा जेवणाने शरीराला स्नेह-ओलावा तो किती मिळणार आणि पोषण ते काय मिळणार?


स्नेह नसेल तर सारे काही बिघडते आयुर्वेदाने 'स्नेहमयो अयं पुरुषः' (हे शरीर स्नेहापासून तयार झालेले आहे) असे जे म्हटले आहे, त्याचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. शरीरामध्ये स्नेह/ चरबी नसेल तर शरीरामधला कोणताही अवयव त्याचे कार्य व्यवस्थित करु शकणार नाही. त्वचेवर स्नेह-ओलावा नसला तर काय होईल? सांध्यांमध्ये स्नेह- ओलावा नसेल तर त्यांना चलनवलन करता येणार नाही. रक्तवाहिन्यांच्या आतून स्नेह/ ओलावा नसेल तर रक्तवाहिन्यांमधून रक्त सुरळीतपणे वाहाणार नाही,नसांमधून चेतनेचे वहन नीट होणार नाही, स्नायूंचे आकुंचन- प्रसरण व्यवस्थित होणार नाही, हृदयाची पंपिंग-क्रिया नीट होणार नाही, आतड्यातील पचनक्रिया व्यवस्थित होणार नाहीत; एकंदरच शरीरात स्नेह-ओलावा कमी होऊन कोरडेपणा वाढला तर शरीरामधील यच्चयावत क्रिया बिघडून जातील. दुर्दैवाने आधुनिक वैद्यकशास्त्र आहाराच्या या दोषांचा विचारही करत

नाही. वातप्रकोपक कोरडे अन्नपदार्थ कोणते? (आयुर्वेदीय आहार विमर्श, पृष्ठे१३७-१७५) वातप्रकोपास कारणीभूत होणारे रूक्ष म्हणजे शरीरामध्ये कोरडेपणा वाढवणारे आहारीय पदार्थ नेमके कोणते, ते सुद्धा जाणून घेऊ. यातले जे पदार्थ थंड आहेत, त्यांचा तसा उल्लेख केलेला आहे. कारण कोरडेपणानंतरचा वाताचा महत्त्वाचा गुण म्हणजे थंडावा. साहजिकच शरीरामध्ये थंडावा वाढवणारे पदार्थ हे शरीरामध्ये वात वाढवण्यास विशेषकरुन कारणीभूत ठरतात. अति तिथे वात म्हणून सांभाळून इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, या पदार्थांचे सेवन झाले म्हणजे शरीरामध्ये वातप्रकोप झाला (वात वाढला) असा अर्थ होत नाही. कोणतीही विकृती (आजार) अनेक कारणे जेव्हा संयुक्तपणे एकत्र येतात, तेव्हा तयार होते. सहसा एकाच कारणामुळे नाही. उदाहरणार्थ तुमची वातप्रकृती असेल, तेव्हाचा काळ सुद्धा वातप्रकोपाचा म्हणजे वर्षा ऋतू असेल, त्याचवेळेला तुम्ही रात्री जागरण- अतिसंभाषण- अति चालणे- अति गायन- अति मैथुन- अतिव्यायाम वा अतिपरिश्रम केलेले असतील किंवा तुमच्या शरीरक्षमतेपेक्षा अधिक असा कामाचा-परिश्रमाचा बोजा पडल्याने शरीराच्या त्या -त्या अवयवावर खूप ताण पडला असेल, तुमच्या आहारामध्ये स्नेहाचा (तेल-तूप- लोणी वगैरेचा) अभाव असेल व तुम्ही शरीरामध्ये कोरडेपणा वाढवणारा व एकंदरच वात वाढवणारा असा आहार अतिप्रमाणात-सातत्याने घेत असाल; तर मात्र वातप्रकोप होण्याची शक्यता बळावते. शरीररुपी यंत्राच्या स्थूल- सूक्ष्म-अगम्य अशा विविध क्रियांमागील प्रेरक- संचालक-नियंत्रक अशा वाताचा प्रकोप होण्यामागे इतक्या कारणांची साखळी एकमेकांशी जुळून येते आणि तेव्हाच वातविकार जन्माला येतो!



## आधुनिक जगात मेन्टॉर्स खरंच असावेत?

गुरू ही संकल्पना आपल्या देशात फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. स्वतः चे घर सोडून ज्ञान संपादनासाठी गुरुगृही जाऊन राहणे ही आपली परंपरा. अशा वेळेस अर्थातच केवळ विद्या प्राप्त होत नसे तर शिष्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाकडे गुरुचे लक्ष असे. विशिष्ट विद्या आणि त्याबरोबरच आयुष्याला सामोरे जाण्याचे बळ मिळवून शिष्य गुरुगृहातून परत येत असे. वैयक्तिक आयुष्य सुरू केले तरी गुरुविषयी ऋणभावना मनात कायम राही. तसेच आयुष्यातल्या अवघड वळणावर गरज पडल्यास पुन्हा एकदा गुरूकडे धाव घेण्याचीही मुभा होती. एकदा गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले की ते कायम टिकत असे. कोणाचा शागीर्द? विद्यार्जनाप्रमाणेच अध्यात्मिक क्षेत्रात प्रगती करायची असेल तर 'गुरू करणे' आवश्यक असते. संत परंपरेमध्येही गुरूला महत्त्व आहे. त्यामुळेच चांगदेवाचे गुरू नामदेव, नामदेवांचे गुरू ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरांचे गुरू निवृत्तीनाथ अशी गुरू शिष्य परंपरा आपल्याला दिसून येते. कलेच्या क्षेत्रात आजही गुरू शिष्य परंपरा कायम दिसते. एखादा उत्तम गाणारा 'कोणाचा शिष्य किंवा शागीर्द' याची चर्चा असते. वर्षानुवर्षे गुरुकडून कला अवगत करण्यासाठी धडपडणारे अनेक आजही आपल्याला दिसतात. ही परंपरा मात्र केवळ आपल्याच देशात नाही तर जगभरात दिसून येते. गुरूंचे महत्त्व गुरुची छाप शिष्याच्या हावभावांमध्ये, वागण्यामध्ये, विचार करण्यामध्ये सगळ्यात दिसते. असा गुरूचा शिष्यावर प्रभाव असतो. आपल्या ज्ञानाची, विचारांची, कलेची, नैपुण्याची तसेच अध्यात्मिक शक्तीची पुढली पिढी गुरू घडवत असतो आणि त्यातूनच अनेक विद्या, कला, अध्यात्मिक ज्ञान यांचे जतन होते.



फार पूर्वीपासून आपण गुरुचे महत्त्व जाणले आणि गुरूला समाजात स्थान दिले. आजची स्थिती काय आहे? आज विद्यार्थी शिक्षक किंवा प्रशिक्षकांकडे शिकतो. शाळा महाविद्यालयांमध्ये शिक्षक असतात. क्रीडा क्षेत्रात कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षक असतात. प्रत्येक क्षेत्रात विद्यार्थी शिकतात, परीक्षा देतात आणि पुढच्या टप्प्यावर पोहोचतात. शिक्षक- विद्यार्थी नाते शिक्षकी पेशा स्वीकारलेले विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ज्ञान देतात. विद्यार्थी यातून आपल्या आपल्या कुवतीप्रमाणे शिकतो आणि आयुष्यातल्या यशापयशाला एकटाच समोर जातो. काही शिक्षक मात्र केवळ शिकवण्याची दिलेली जबाबदारी पार पाडत नाहीत तर, अनेक विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे, त्यांना येणाऱ्या अडचणींकडे विशेष लक्ष पुरवतात आणि त्या त्या विद्यार्थ्याला मार्गदर्शन करतात. असे दिसून येते की, अशा शिक्षकांची विद्यार्थ्यांवर छाप पडते आणि विद्यार्थी त्यांचे अनुकरण करतात. तसेच या विद्यार्थ्यांची प्रगतीही चांगली झालेली दिसून येते. हे शिक्षक त्या विद्यार्थ्यांचे गुरू होतात. व्यक्तिमत्व विकासासाठी मेन्टॉर केवळ एखाद्या विषयाचे ज्ञान मिळवणे पुरेसे नसते. त्या ज्ञानाचा उपयोग करून आपले व्यक्तिमत्व घडवायचे तर कुणाचा तरी मदतीचा हात मिळणे आवश्यक असते.

# विद्यादानातून सशक्त व समृध्द भारताच्या निर्मितीचे काम जेएसपीएम संस्थेच्या माध्यमातून कायम होत आहे –स्वामी धर्मबंधू



लातूर दि.२७–०७–२०२४ सर्वश्रेष्ठ दान हे विद्यादान आहे. हे पुण्याचे काम भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याकडून होत आहे. या संस्थेच्या संस्काराच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडले असून ते विविध ठिकाणी चांगल्या पदावर कार्यरत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून विद्यादानाचे सर्वश्रेष्ठ काम होत आहे. त्यामुळे यापुढील कालावधीतही विद्यादानातून सशक्त व समृध्द भारताच्या निर्मितीचे काम कायम चालू ठेवावे असे प्रतिपादन श्री वैदिक मिशन ट्रस्टचे संस्थापक तथा गुजरातमधील प्रसिध्द पीठाधिश स्वामी धर्मबंधू यांनी केले. यावेळी ते जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित देशभक्ती व संस्कार मार्गदर्शन शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे होते. तसेच जेएसपीएमच संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, आर्य समाज राम नगरचे प्रधान एस.आर.मोरे, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी महासभेचे उपप्रधान राजेंद्र दिवे, भक्ती नगर आर्य समाज शाखेचे अशोक पवार, आर्यवीर दलाचे अधिष्ठाता व्यंकटेश हालिंगे, समन्वयक विनोद जाधव, ओमप्रकाश शास्त्री, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना स्वामी धर्मबंधू म्हणाले की, शिक्षक आचार्य चाणक्य म्हणतात, आपला जन्म गरीब कुटुंबात झाला तरी ती वाईट गोष्ट नाही. परंतु त्या जीवनाला समृध्द व स्वावलंबी बनविण्याचे काम आपण उत्साहाने करतो. आपल्या देशामध्ये सर्व असतानाही आपण समृध्दी येण्यासाठी प्रयत्नशील राहत नाही. अत्यंत कमी कालावधीमध्ये त्स्विझरलँड, इज्राईल आणि जपान या देशाची प्रगती झालेली आहे. त्यामुळे शालेय शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना आपले भविष्य मंदिर, मिस्जीदीमध्ये नसून शाळेमध्ये आहे, हे लक्षात घेऊन आपली प्रगती साधण्याचे काम करावे. हे कार्य करीत असताना वेळेवर शाळेला जाणे, मन लावून अभ्यास करणे, उत्साहाने होमवृर्क पूर्ण करणे व मन लावून अभ्यास करणे या गोष्टी आत्मसात केल्या तर आपली आणि देशाची प्रगती चौफेर होईल. खर्या अर्थाने आपली स्पर्धा ही आपल्याशी आहे, त्यामुळे या स्पर्धेच्या माध्यमातून आपली आणि आपल्या देशाची प्रगती साधण्याचे काम आपण करावे आणि या माध्यमातून नोकरी मिळविणार्यापेक्षा नोकरी देणारे व्हा! असा सल्लाही त्यांनी यावेळी बोलताना दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी संयोजन समितीच्यावतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अब्दूल गालिब शेख यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन इंग्शिल स्कूलचे शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी देशाचे नाव जगात पोहचविण्याचे काम केले – माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर गेल्या चाळीस वर्षापासून जेएसपीएम संस्थेचे काम सुरू आहे. जेएसपीएम संचालित ३८ युनिटच्या माध्यमातून अध्यात्म, विज्ञान व व्यावसायीकतेवर आधारित तेजस्वी तरूण घडविण्याचे काम सुरू आहे. देशामध्ये सर्वाधिक तरूण भारतात आहेत. यामध्ये १८ ते ३४ वयोगटातील ६० टक्के तरूणांचा समावेश आहे. सर्वात जास्त हूशार तरूणही भारतात आहेत आणि सुशिक्षीत बेकारांची अधिक संख्याही आपल्याकडेच आहे. परंतु हा येथील चुकीच्या शिक्षणपध्दतीचा दोष आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सीबीसीएस शिक्षण पध्दती लागू करून अध्यात्म, विज्ञान, योगा यावर आधारित शिक्षणपध्दती आणून देशातील शिक्षणपध्दती सुधारण्याचे काम केले. त्यांनी गेल्या दहा वर्षामध्ये देशाचा चौफेर विकास करून भारत देशाची ओळख जगात पोहचविण्याचे काम केलेले आहे, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा भाजपा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

# थकबाकीदारांचे २२ गाळे मनपाने केले सील




लातूर : प्रतिनिधी लातूर शहर महानगरपालिका मार्फत मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडे वसुलीसाठी विशेष वसुली मोहिम सुरु करण्यात आली आहे. सदर वसुली मोहिम ही आयुक्त, बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्वये सुरु करण्यात आली आहे. सदर वसुली मोहिमेमध्ये सील करण्यात आलेले २२ गाळेधारकांसोबतचा करारनामा रद्द करुन सदर गाळे मनपाने कायमस्वरुपी ताब्यात घेतले आहे. सदर मनपाने ताब्यात घेतलेले गाळे हि खालीलप्रमाणे व्यापारी संकुलामधील आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेच्या मालकीच्यात गांधी मैदान सा. क्र.१११ व्यापारी संकुल येथील गाळा क्र. ४८, ७८, ७९, १०५ व गांधी मैदान सा. क्र. ११२ व्यापारी संकुल येथील गाळा क्र. ६३ व सारोळा रोड येथील गाळा क्र. ३,१४,१५,१९ व फ्रुट मार्केट येथील गाळा क्र.१०३, ११३, २०८, २०९, २१०, २१३, २२१, २२३, २२६, २३०, २३७, २३८, २४३ गाळे असे एकूण २२ गाळे मनपाने ताब्यात घेतले आहेत. त्याअनुषंगाने लातूर शहरातील मनपा मालकीच्या गाळेधारकांना उपायुक्त, डॉ. पंजाब खानसोळे यांनी आवाहन केले की, वरीलप्रमाणे ताब्यात घेतलेले गाळे मनपा मालकीचे असून सदरील गाळयांचा करार रद्द करण्यात आला आहे व सदरील गाळयांचा फेर लिलाव मनपा करणार आहे. तरी ज्या गाळे धारकांकडे थकबाकी आहे, अशा गाळे धारकांनी तात्काळ थकबाकीचा भरणा करुन मनपास सहकार्य करावे. व गाळे धारकांनी थकबाकी भरणा न केल्यास अशा गाळेधारकांवर अशीच कार्यवाही सुरु रहाणार आहे.

# ‘ओबीयू’ द्वारे होणार सॅटेलाईट टोल संकलन!

नवी दिल्ली : वृत्तसंस्था सध्या वाहनांना टोल देण्यासाठी टोल नाक्यावर थांबावे लागते. यामध्ये मोठ्या प्रमाणावर मॅनपॉवर लागत होते. तसेच, अनेकदा तगडा जामही लागतो. फास्टॅग आल्यानंतर मनुष्यबळ कमी झाले. पण सर्व्हरमध्ये समस्या आल्यास जामची समस्या कायम होती. आता सॅटेलाइट बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीममध्ये टोल कारमध्ये लावलेल्या ट्रॅकिंग सिस्टीमद्वारेच वसूल केला जाईल. यासाठी सॅटेलाइट स्वत:च कारच्या निश्चित केलेल्या अंतराची गणना करेल आणि त्यानुसार टोल वसूल केला जाईल. या सिस्टीमला सॅटेलाइट बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीम किंवा जीपीएस बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीम म्हणतात. सॅटेलाईट बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीम कारमध्ये लावलेल्या ओबीयू (ऑन–बोर्ड युनिट) च्या मदतीने काम करेल. या ओबीयूच्या मदतीने सॅटेलाईट कारच्या निश्चित केलेल्या अंतराचा मागोवा घेईल. या नवीन सिस्टीमसाठी कारमध्ये ओबीयू बसवावा लागेल. हे ओबीयू कारची प्रत्येक माहिती गोळा करेल, ज्याला हायवेवर लावलेल्या कॅमे–यांनी सॅटेलाइटसोबत शेअर केले जाईल, ज्यामुळे सॅटेलाइटद्वारेच टोल वसूल केला जाईल. या सिस्टीममध्ये तुम्हाला ओबीयूसोबत जोडलेल्या वॉलेटमध्ये पैसे ठेवावे लागतील. सध्या



कारमध्ये ओबीयू उपलब्ध नाही, त्याला बाजारातून बसवावे लागेल. असे मानले जात आहे की, ही सिस्टीम लागू झाल्यानंतर कारमध्ये ओबीयू आधीपासून लावलेले असतील. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा दावा आहे की, संपूर्ण जगात हा पहिलाच टोल कलेक्शन सिस्टीम आहे, ज्यामध्ये जीपीएस बेस्ड तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. नवीन टोल कलेक्शन सिस्टीम लागू झाल्याने वाहनचालकांना टोलवर थांबावे लागणार नाही. यामुळे हायवेवर ना तर जाम लागेल आणि ना लोकांचा वेळ वाया जाईल. असे मानले जात आहे की, या सिस्टीममुळे प्रवास आणखी सोपा होईल.

डिसेंबर २०२३ मध्ये, नितीन गडकरी यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणचे लक्ष्य मार्च २०२४ पर्यंत या नव्या प्रणालीला लागू करण्याचे आहे, असे सांगितले होते. टोल नाक्यावरीला प्रक्रियांना सुव्यवस्थित करणे आणि प्रतीक्षा वेळ कमी करण्याच्या प्रयत्नांबद्दल वर्ल्ड बँकेला सूचित करण्यात आले आहे. सॅटेलाईट टोल नाक्यावरील सरासरी प्रतीक्षा वेळ लक्षणीय कमी झाला आहे. कर्नाटकातील बंगळुरू–मैसूर विभागात आणि हरियाणातील पाणिपत–हिसार विभागात या प्रणालीचा यशस्वी वापर झाला आहे.

# आषाढी पंढरपूर यात्रेतून १ कोटी १५ लाखांचे उत्पन्न

लातूर : सिध्देश्वर दाताळ लातूर जिल्हयातून पंढरपूरला श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आषाढी वारी निमित्त मोठ्या प्रमाणात भाविक–भक्त पायी व वाहनांनी जातात. भाविक–भक्तांना पंढरपूरला श्री. विठ्ठलाच्या दर्शनाला जाण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने लातूर विभागातील पाच आगारातून १२७एसटी बसेसची सोय करण्यात आली होती. आषाढी यात्रेतून आवघ्या १० दिवसात १२७ एसटी बसेसनी २ लाख १९ हजार १२३ किलोमिटरचा प्रवास करत १ कोटी १५ लाख ४६ हजार ८२९ रूपयांचे उत्पन्न लातूर विभागाने मिळवले आहे.


गतवर्षाप्रमाणे यंदाही आषाढी यात्रेनिमित्त लाखो वारकरी लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी एस.टी.ने पंढरपुरात दाखल झाले होते. वारक–यांच्या सेवेसाठी एस.टी.महामंडळातर्फे १३ जुलै ते २२ जुलै दरम्यान सुमारे १२७ विशेष बसेस सोडण्यात आल्या होत्या. या १२७ बसेसव्दारे ९६० फे–यांमधून ७८ हजार १२५ भाविक–प्रवाशांनी सुरक्षित प्रवास केला असून, यातून १ कोटी १५ लाखांचे रुपये उत्पन्न एस.टी महामंडळाला मिळाले आहे. या वारीचा मुख्य दिवस दि. १७ जुलै हा आषढी एकादशीचा दिवस समोर ठेवून राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभागाने दि. १३ जुलै ते २२ जुलै



या कालावधीत लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर या पाच आगारातून १२७ एसटी बस गाडयांचे नियोजन करण्यात आले होते.

प्रवाशांनी एसटीवर दाखवलेल्या प्रचंड विश्वासाला एसटीच्या अधिकारी, कर्मचा–यांनी अथक प्रिश्रमांतून सार्थ ठरवले आहे. यापुढे देखील सर्वसामान्य प्रवासी जनतेला सुरिक्षत, किफायतशीर व सन्मानजनक सेवा देण्यासाठी एसटी महामंडळ कटिबध्द राहिल असा विश्वास लातूर विभागाचे विभाग प्रमुख विश्वजीत जानराव यांनी व्यक्त केला आहे.

# दरवर्षी १.६ लाख लोकांचा हिपॅटायटिसने होते मृत्यू



लातूर : प्रतिनिधी जागतिक हिपॅटायटीस दिवस दरवर्षी २८ जुलै रोजी साजरा केला जातो. हा दिवस नोबेल पारितोषिक विजेते बारुख सॅम्युअल ब्लमबर्ग, हिपॅटायटीसचा शोध लावणारा, यांच्या सन्मानार्थ निवडण्यात आला. दिल्लीच्या नॅशनल कॅपिटल टेरिटरी (एनसीटी) सरकारने स्थापन केलेल्या लिव्हर अँड बिलीअरी सायन्सेस इन्स्टिट्ट्युटच्या आकडेवारीनुसार, सुमारे ४ कोटी लोक भारतात हिपॅटायटीस बी पासून ग्रस्त आहेत आणि जवळजवळ १.२ कोटी लोकांना हिपॅटायटीससी आहे. या रोगामुळे दरवर्षी १.६ लाख लोक मरतात. जगात, प्रत्येक ३० सेकंदाला एक व्यक्ती हिपॅटायटीस संबंधित आजाराने मरते. जगामध्ये भारताचा ६२ वा क्रमांक लागतो, अशी माहिती येथील पोट विकार तज्ज्ञ डॉ. दीपक गुगळे यांनी दिनी. व्हायरल हिपॅटायटीसच्या जागतिक ओझ्याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि हिपॅटायटीसचे प्रतिबंध (लसीकरण), निदान (तपासणी), संक्रमण आणि उपचार सुलभ करण्यासाठी जगाला एकाच थीमखाली एकत्र आणले जाते. २०२४ मध्ये जागतिक हिपॅटायटीस दिन ची थीम ‘कृती करण्याची वेळ आह’ आहे. मेंदूनंतर यकृत हा दुस–या क्रमांकाचा आणि शरीरातील सर्वात गुंतागुंतीचा अवयव आहे. आपल्या शरीरातील पाचन तंत्राचा मुख्य खेळाडू आहे. यकृतचे वजन सुमारे १०० ग्रॅम आणि १५ सेमी लांबी आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार यकृतातील आजार हे मृत्यूच्या १० व्या सर्वात सामान्य कारण आहेत. जगामध्ये लीव्हरच्या आजारामध्ये इजिप्त, नायजेरिया, कंबोडिया आघडीवर आहेत. २०२२ मध्ये क्रोनिक व्हायरल हेपेटायटीस बी आणि सी मुळे अंदाजे १.३ दशलक्ष लोक मरण पावले, म्हणजे दररोज ३५०० मृत्यू झाले. अंदाजे २५४ दशलक्ष लोक हिपॅटायटीस बी सह जगत आहेत आणि जगभरात ५० दशलक्ष लोक हिपॅटायटीस सी सह जगत आहेत आणि सहा हजार लोकांना दररोज व्हायरल हिपॅटायटीसची नवीन संसर्ग होत आहे. भारतात, ताज्या अंदाजानुसार, ४० दशलक्ष लोकांना हिपॅटायटीस बी ची तीव्र संसर्ग आहे आणि ६ ते १२ दशलक्ष लोकांना हिपॅटायटीस सी ने दीर्घकाळ संसर्ग झालेला आहे. एचईव्ही हा साथीच्या हिपॅटायटीसचे सर्वात महत्वाचे कारण आहे, जरी एचईव्ही मुलांमध्ये अधिक सामान्य आहे. या आजारचे रुद्र स्वरुप बघून, भारत सरकारने या वर्षी फार मोठ्या प्रमाणात लसीकरण, तपासणी व उपचार मोहीम चालू केली आहे. विशेषत: बी आणि सी प्रकारांमुळे लाखो लोकांमध्ये दीर्घकालीन आजार होतो आणि यकृत सिरोसिस, यकृताचा कर्करोग आणि विषाणूजन्य हिपॅटायटीस–संबंधित मृत्यूचे हे सर्व सामान्य कारण आहेत. काही प्रकारचे हिपॅटायटीस लसीकरणाद्वारे टाळता येऊ शकतात, असेही डॉ. दीपक गुगळे म्हणाले.

# कॉलेजच्या वसतिगृहात घुसून पोलिसांनी केली विद्यार्थ्यांना मारहाण, १० हून अधिक जखमी




पाकूर : झारखंडच्या पाकूर जिल्हा मुख्यालयात असलेल्या केकेएम कॉलेजच्या वसतिगृहात शुक्रवारी रात्री पोलिसांनी विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केली. यात १० हून अधिक विद्यार्थी जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी पाकूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. झारखंडमधील बांगलादेशी घुसखोरीविरोधात विद्यार्थ्यांनी आज निषेध रॅली काढण्याची घोषणा केली होती. मात्र, शुक्रवारी रात्री उशिरा पोलीस अधिकारी वसतिगृहात पोहोचले आणि रॅली न काढण्यासाठी दबाव टाकला. मात्र विद्यार्थ्यांनी त्यांना नकार दिल्याने पोलिसांनी त्याला लाठ्याकाठ्याने जबर मारहाण करण्यात आली. दुसरीकडे, पोलिसांचे म्हणणे आहे की, एका व्यक्तीचे अपहरण झाल्याच्या माहितीवरून पोलिसांचे पथक वसतिगृहात पोहोचले असता मोबाईल लोकेशन तपासत असताना विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. विद्यार्थी नेते कमल मुर्मू यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, आधीच नियोजित निषेध रॅली थांबवण्यासाठी, एक पोलीस अधिकारी काल रात्री १०.३० वाजता वसतिगृहात आला आणि त्यांना सांगितले की रॅली काढू नका. याला विद्यार्थ्यांनी नकार दिला. यानंतर रात्री १ वाजण्याच्या सुमारास १०० हून अधिक पोलीस अधिकारी आणि शिपाई काठ्या घेऊन वसतिगृहात पोहोचले आणि विद्यार्थ्यांच्या खोल्या उघडून त्यांना मारहाण केली.

पाकूर नगर पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक अनूप रोशन भेंगरा यांनी सांगितले की, उपनिरीक्षक नागेंद्र कुमार यांच्यासह पोलिसांचे पथक अपहरण प्रकरणाचा तपास करण्यासाठी वसतिगृहात पोहोचले होते, तेव्हा तेथे उपस्थित काही तरुणांनी त्यांच्यावर हल्ला केला. यामध्ये एक पोलीस अधिकारी आणि अन्य एक जण जखमी झाला. दुस–यांदा पोलिस हल्लेखोरांना पकडण्यासाठी गेले असता सौम्य बळाचा वापर करण्यात आला. असे भेंगरा म्हणाले. दरम्यान या प्रकरणावरून भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बाबुलाल मरांडी आणि झारखंड विधानसभेतील विरोधी पक्षनेते अमर कुमार बौरी यांनी म्हटले आहे की, बांगलादेशी घुसखोरीविरोधात आवाज उठवल्याने हेमंत सरकार इतके घाबरले आहे की ते विद्यार्थ्यांवर हल्ले करत आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE